# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०२/२०२५ (गुरूवार)संध्याकाळ**

---

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या विविध उपक्रमांतर्गत तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी घेण्यात आले शिबीर

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या विविध उपक्रमांतर्गत रामटेक उपविभागामध्य उपविभागीय पोलिस अधिकारी,रामटेक श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वामध्ये पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत पंचायत समिती पारशिवनी येथे दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन सत्रामध्ये नवीन तीन कायदे भारतीय न्याय संहिता —२०२३,भारतीय नागरीक सुरक्षा संहिता—२०२३, भारतीय साक्ष अधिनियम —२०२३ या तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिध्दी साठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये सर्व ग्राम विकास अधिकारी,उमेद च्या सदस्य, आशा वर्कर, मुख्याध्यापक, शिक्षक व अंगणवाडी सेविका असे उपस्थित होते. शिबिरास डॉ. अभिलाषा खरे सहायक प्राध्यापिका सिम्बॉयसिस स्कूल ऑफ लॉ नागपूर तसेच ॲडव्होकेड मंजुषा किरटकर विधी अधिकारी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, रामटेक यांनी मार्गदर्शन केले.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर